भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2015 ◐ NY 165137

जोडपत्र - २

दिनांक ....................

२. ..........

३. .......... होय / नाही

४. ..........

५. ... नाव, पत्ता व सही ... गिरिश रविंद्र नवाथे

६. ..........

७. ..........

८. ..........

९. .......... मुद्रांक विक्रेता ...

4 MAY 2016

Nawathe

**जलतरण तलाव आणि सहाय्यक उपकरण/मशिनरी यांच्या देखभालीचा करारनामा**

**करारनाम्याचा कालावधी दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१८**

**पक्षकार क्र. १ :** कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**पक्षकार क्र. २ :** श्री गिरीश रविंद्र नवाथे, वय वर्षे ४०, रा. नवाथे बगीच्या, दसरा मैदान समोर, बडनेरा रोड, अमरावती, कंत्राटदार, जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांट व सहाय्यक उपकरण आणि मशिनरी देखभाल.

**ज्याअर्थी** श्री गिरीश रविंद्र नवाथे, (पक्षकार क्र.२) ज्यांना यापुढे कंत्राटदार म्हणून संबोधिले जाईल व त्यामधील अन्य भागात त्यांचे कायदेशिर वारस अथवा उत्तराधिकारी यांचा समावेश राहील.

..२..

Scanned by CamScanner

आणि

**ज्याअर्थी** विद्यापीठाचा जलतरण तलाव आणि सहाय्यक उपकरण/मशिनरी यांच्या देखभालीकरिता कुलसचिव (पक्षकार क्र.१) यांच्याद्वारे तिसऱ्या वेळेमध्ये निविदा प्रसिद्ध केल्यानंतर प्राप्त झालेल्या एकुण ०२ निविदांपैकी निविदा उघडणाऱ्या समितीद्वारे ०२ निविदा पात्र ठरविण्यात आल्या व पात्र ठरलेल्या निविदेनुसार **कंत्राटदार श्री गिरीश रविंद्र नवाथे, अमरावती** यांनी निविदेत नमुद केलेल्या कमीत कमी दरास विद्यापीठाच्या क्रय समिती सभेने दिनांक ३१.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सभेत **विषय क्र. २** अन्वये खालीलप्रमाणे नमुद केलेल्या दरास मान्यता प्रदान केली आहे.

| **कंत्राटदाराने निविदेमध्ये कामगारांच्या पदनामनिहाय नमुद केलेले मासिक व वार्षिक दर** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दराचा प्रकार | प्लॅन्ट ऑपरेटर ०१ (एक) | निरिक्षक ०२ (दोन) | जीवनरक्षक ०२ (दोन) | चुषण सफाई कर्मचारी ०२ (दोन) | सफाई कामगार ०२ (दोन) | पर्यवेक्षक ०१ (एक) | मासिक व वार्षिक दरानुसार एकुण रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| मासिक दर | ९०००/- | १५०००/- | १८०००/- | १३५००/- | १३५००/- | ९०००/- | ७८०००/- |
| वार्षिक दर | १०८०००/- | १८००००/- | २१६०००/- | १६२०००/- | १६२०००/- | १०८०००/- | ९३६०००/- |

आणि

**ज्याअर्थी** जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांट आणि सहाय्यक उपकरण/मशिनरी यांच्या देखभालीकरिता कंत्राटदाराने त्यांच्या निविदेत नमुद केल्यानुसार नियुक्त करण्यात येणाऱ्या मजुरांच्या दरानुसार **प्रति माहे रूपये ७८०००/- (अक्षरी रूपये अठ्याहत्तर हजार फक्त)** अर्थात एक वर्षाचे कालावधीकरिता एकुण रूपये ९,३६,०००/- (अक्षरी रूपये नऊ लाख छत्तीस हजार फक्त) इतका राहील,

**त्याअर्थी** व्यवस्थापन परिषदेने दिनांक २७.०४.२०१६ रोजीच्या सभेत विषय क्र. २७ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (पक्षकार क्र.१) यांचे समक्ष कंत्राटदार, श्री गिरीश रविंद्र नवाथे, अमरावती (पक्षकार क्र.२) यांचे सोबत **दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१८** या दोन वर्षाचे कालावधीकरिता हा करार करण्यात येत असुन करारनाम्यामधील खालील नमुद सर्व अटी व शर्ती कंत्राटदार (पक्षकार क्र.२) यांना मान्य राहतील असे स्विकृत केले आहे.

## जलतरण तलाव व फिल्ट्रेशन प्लांट देखभालीच्या अटी व शर्ती

**खंड क्र.१ :** i) या करारामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जलतरण तलाव आणि तेथे असलेले सहाय्यक उपकरण/मशिनरी व फिल्ट्रेशन प्लांटची देखभाल करणे ही बाब अंतर्भुत राहील व सदर देखभालीकरिता उपरोक्त तक्त्यात नमुद करण्यात आलेले सर्व कर्मचारी कंत्राटदार यांचे नियंत्रणात निर्धारित वेळेत कार्यरत राहतील व सर्व कर्मचाऱ्यांचे दैनंदिन हजेरीपत्रक कंत्राटदार (पक्षकार क्र.२) अद्ययावत ठेवील.

ii) विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकारणीने/सक्षम अधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या कामांचा यामध्ये समावेश असुन ही कामे कंत्राटदार (पक्षकार क्र.२) यांचेवर सोपविण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

**खंड क्र.२ :** i) पक्षकार क्र.२ ने असे स्विकृत करतो आहे की, तो फिल्ट्रेशन प्लांट मध्ये असलेल्या उपकरणांची/मशिनरीची देखभाल करण्याकरिता नियम क्र. ३/२००२ मधील तरतुदीनुसार पुरविण्यात येणारे देखभाल कार्ड अद्ययावत ठेवेल.

ii) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, तो विहित नमुन्यानुसार तक्रार नोंदवही तयार करून अद्ययावत ठेवेल, ज्यामध्ये येणाऱ्या सर्व तक्रारींची नोंद ठेवली जाईल व त्यावर निरिक्षणाचे वेळी स्वाक्षरी प्राप्त केली जाईल.

iii) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, तो निवारक अनुरक्षण रिपोर्ट (preventive maintenance report) प्रत्येक इंग्रजी महिन्याच्या ०५ तारखेला सादर करेल.

iv) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, तो उपकरणांचे बदलविण्यात आलेले सर्व सुटे भाग नियंत्रण अधिकाऱ्यांकडे जमा करेल, कंत्राटदाराने निश्चित स्वरूपात जुने नादुरूस्त भाग बदलवून नविन भाग लावलेले आहेत किंवा नाही याची खात्री करण्याकरिता नियंत्रण अधिकारी त्याची नोंद घेऊन ठेवेल. व नादुरूस्त असलेल्या सुटे भागांच्या अपलेखनाची कार्यवाही लेखा संहितेमधील तरतुदीनुसार केली जाईल.

v) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांट देखभालीकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्व कामकारांच्या जलतरण तलावाचे परिक्षेत्रात होणाऱ्या संभाव्य अपघाताची जबाबदारी त्याची राहील आणि पक्षकार क्र.२ ला त्याचेद्वारे नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीयकृत विमा सुरक्षा कंपनीचा अपघात किंवा मृत्यु उपदार प्राप्त करून घेण्याकरिता प्रदान करावयाच्या लाभाचा विमा काढेल व याबाबतची खात्री होण्याकरिता पक्षकार क्र.२ ला प्रिमीयम भरल्याबाबतची पावती पक्षकार क्र.१ ला दाखवावी लागेल.

vi) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, जलतरण तलावातील पाण्याची शुद्धता, आरोग्य, अप्रदुषण आणि pH स्तर जपण्याची काळजी घेण्याकरिता तो जबाबदार राहील.

vii) जर नियम क्र. ३/२०१४ मधील अट क्र. १७ ची अंमलबजावणी करण्याकरिता कंत्राटदाराला कोणत्याही स्वरूपाची अडचण निर्माण झाल्यास तो सर्वप्रथम सदर बाब नियंत्रण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणुन देईल व ती बाब नियंत्रण अधिकारी कुलसचिव यांचे निदर्शनास आणुन देईल आणि निरिक्षण व खात्रीनंतर या बाबींचे विद्यापीठाच्या योजना व पद्धतीनुसार निराकरण करण्यात येईल.

viii) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, तो करारनाम्यातील तरतुदीनुसार प्रत्येक महिन्याला शोधनाकरिता देयक सादर करील.

ix) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, जलतरण तलावाचे पाणी पोहण्यायोग्य ठेवण्याकरिता आणि हे पाणी पोहण्यायोग्य न राहिल्यास जी हानी पोहचेल त्याकरिता कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील.

x) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, तो प्रत्येक दिवशी जलतरण तलाव उघडण्यापुर्वी पाण्याची तपासणी करेल व त्याचा अहवाल महिन्याचे शेवटी नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करेल.

xi) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, पाण्याच्या देखभालीकरिता चांगल्या प्रतिच्या रसायनांची शिफारस करणे बंधनकारक राहील व भविष्यात रसायनांच्या उपयोगामुळे कोणत्याही सदस्यांना शारीरिक इजा पोहचणार नाही याची काळजी कंत्राटदाराला घ्यावी लागेल.

..४..

Scanned by CamScanner

xii) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, रसायनांच्या चुकीच्या प्रमाणामुळे कुठलाही अपघात अथवा जिवीत हानी झाल्यास रसायनामुळे अपघातग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई देण्यास कंत्राटदार जबाबदार असेल.

xiii) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो आहे की, जलतरण तलाव व फिल्ट्रेशन प्लांट देखभालीकरिता तो फिल्ट्रेशन प्लांट ऑपरेटर-एक, निरिक्षक-दोन, जीवनरक्षक-दोन, चुषण सफाई कर्मचारी-दोन, सफाई कामगार-दोन व पर्यवेक्षक-एक यांची नेमणुक करेल.

xiv) पक्षकार क्र.२ च्या मर्यादेबाहेरील कुठलीही तांत्रिक अडचण अथवा समस्या असल्यास तो तात्काळ नियंत्रण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणुन देईल.

xv) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो की, जलतरण तलावात पोहता येऊ शकणाऱ्या सदस्यांनाच प्रवेश देण्याची जबाबदारी त्यांची राहील व पोहता येत नसलेल्या सदस्यांना जलतरण तलावाचा उपयोग पोहण्याकरिता दिल्यास व अशा सदस्याचा पाण्यात बुडुन मृत्यु झाल्यास त्याकरिता कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील. तसेच अपघातग्रस्त व्यक्तीच्या नातेवाईकांनी जर यासंदर्भात नुकसार भरपाईचा दावा दाखल केल्यास प्राप्त होणाऱ्या निर्णयानुसार नुकसान भरपाई करून देण्यास प्रथम कंत्राटदार व कंत्राटदार हयात नसल्यास त्यांचे वारस अथवा उत्तराधिकारी जबाबदार राहील.

xvi) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो की, करारनाम्याचे कालावधी दरम्यान कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास मा.कुलगुरू यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

xvii) पक्षकार क्र.२ असे स्विकृत करतो की, जलतरण तलाव आणि फिल्ट्रेशन प्लांट देखभालीची विहित पद्धती नियम क्र. १४/२००२ मध्ये विहित करण्यात आलेली आहे.

**खंड क्र.३ : न्यायनिवाडा -**

कोणत्याही क्षणी कोणताही विविद अथवा मतांतर उभय पक्षांमध्ये या करारनाम्यातील तरतुदी अंतर्गत झाल्यास दोन्हीही पक्ष एकमेकास लेखी स्वरूपात सुचित करेल व एका तज्ञ व्यक्तीकडे न्याय निवाड्याकरिता प्राप्त होणाऱ्या लेखी सूचना वर्ग केल्या जातील. जर उभयपक्ष एका पेक्षा अधिक व्यक्तींकडे न्याय निवाडा व्हावा याची मागणी करत असल्यास ती पुर्ण केली जाईल व न्याय निवाडा करणाऱ्या व्यक्तीने दिलेला निर्णय हा उभय पक्षाला बंधनकारक राहील. न्यायनिवाड्याची कार्यवाही सुरू असतांना करारनाम्यानुसार स्विकारलेले कार्य त्याला पुर्ण करावे लागेल आणि ज्या बाबी विवादात्मक परिस्थितीत मोडत असतील त्यांचे शोधन अंतिम निर्णयापर्यंत थांबविले जाईल. न्यायनिवाडा करण्याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञ व्यक्तीने आकारलेले शुल्क उभय पक्षांना समान आकारणी करून निवाडा करणाऱ्या तज्ञ व्यक्तीला द्यावे लागेल.

**खंड क्र.४ : शोधनाच्या पद्धती -**

**श्री गिरीश रविंद्र नवाथे, अमरावती, कंत्राटदार** यांच्याकडून दरमहा प्राप्त होणारे देयक नियंत्रण अधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्यानंतर त्यांचे नावे विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक महिन्याला धनादेशाद्वारे शोधन केले जाईल.

**खंड क्र.५ :**

करारनाम्यातील कामाचे नियोजन कंत्राटदाराद्वारे स्वतःचे स्तरावर सुनियोजितरित्या केले जाणे अभिप्रेत आहे, तसेच जलतरण तलाव येथे कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची जबाबदारी पक्षकार क्र.२ ची राहील. जेणे करून कार्यन्वयन करत असतांना निर्माण होणाऱ्या

..५..

Scanned by CamScanner

समस्यांची काळजी आपोआप घेतली जाईल. करारनाम्यानुसार पक्षकार क्र.२ ची उपस्थिती प्रत्येक दिवशी सर्व कामगारासोबत जलतरण तलावावर असणे ही या करारनाम्याची प्रमुख आणि महत्वाची अट राहील. जलतरण तलाव पोहण्यायोग्य रहावा याकरिता फिल्ट्रेशन प्लांटची देखभाल या दोन्ही बाबी या करारनाम्यातील प्रमुख अटी आहे.

**खंड क्र.६ :**

जर कदाचित कंत्राटदार करारनाम्याचे कालावधी दरम्यान जलतरण तलाव पोहण्यायोग्य ठेवण्यास असमर्थ अथवा असक्षम ठरल्यास, विलंब किंवा जी हानी विद्यापीठाची होईल आणि सदस्यांनी जर कुठल्याही नुकसान भरपाई मागितल्यास त्यावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेला निर्णय अंतिम व उभय पक्षांस बंधनकारक राहील.

**खंड क्र.७ :**

पक्षकार क्र.२ च्याद्वारे सनियंत्रांची देखभाल करण्याकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या कोणत्याही कामगाराचे विद्यापीठाशी संबंध राहणार नाही. पक्षकार क्र.२ हाच त्याचा नियोक्ता राहील व सर्वसंबंधीत कामगारांच्या मजुरीच्या शोधनाची जबाबदारी सुद्धा कंत्राटदाराशिवाय कोणाचीही राहणार नाही.

**खंड क्र.८ :**

पक्षकार क्र.२ हा त्यांच्या निश्काळजीपणामुळे किंवा त्याच्या स्वतःच्या बेजबाबदारपणामुळे जलतरण तलावास अथवा सदस्यास कोणतीही क्षती अथवा हानी पोहचल्यास जबाबदार राहील.

**खंड क्र.९ :**

जर कंत्राटदार या करारनाम्यातील कोणत्याही करारनाम्याचा अंशिक अथवा पुर्णतः वारंवार भंग करत असल्यास एक महिन्याची लेखी नोटीस देऊन सदर कंत्राट रद्द करण्यास विद्यापीठास अधिकार राहील.

दिनांक :- ०६.५.२०१६

REGISTRAR
Sant Gadge Baba
Amravati University,
Amravati.

---------------
कंत्राटदार 6/5/2016
नांव - गिरीश रविंद्र नवाथे
नवाथे नगरिया दसरा मैदान
समोर अमरावती

साक्षिदार -
१) ---------------- 6/5/16
नाव - (डॉ. अ. मु. अवनारे)
२) ----------------
नाव - (नरेश रंगराव देशमुख)

Scanned by CamScanner